चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१७ मार्च, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १६/०३/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, घुग्घुस, दुर्गापुर, वरोरा, भद्रावती, शेंगाव, माजरी, ब्रम्हपुरी, भिसी, सिंदेवाही, पाथरी, सावली, पोंभुर्णा, गोंडपिंपरी, कोठारी, गडचांदुर, बल्लारशाह** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२६** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन २१ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **७,७२,४००/—रू.** चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# एसएसटी पॉईन्ट राजुरा येथे नाकेबंदी दरम्यान ४५ लक्षचे बोगस बियाणे जप्त राजुरा पोलीसांची कार्यवाही

आज दिनांक १६/०३/२०१९ रोजी पोलीस स्टेशन राजुरा अंतर्गत येणाऱ्या एसएसटी पॉईन्टवर चेकींगदरम्यान एका गाडीमध्ये ४५ लक्ष किंमतीचे बोगस बियाण्यांचा माल मिळुन आला.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हयात नाकेबंदी एसएसटी पॉईन्टद्वारे वाहनाची कडक तपासणी सुरू आहे. राजुरा ते आसीफाबाद रोडवरील लक्कडकोट येथील एसएसटी पॉईन्टवर नेहमीप्रमाणे तपासणी सुरू असतांना संशयावरून एक आयशर वाहन एम एच ४९–०२७१ यास थांबवुन वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये मोठया प्रमणात बोगस बीटी बियाणे किं. अंदाजे ४५, ०१,०००/–रू, तसेच यासोबत एक पॅकींग मशीन व वजन काटा मिळुन आला. सदर वाहनातील चालक आरोपी नामे मुख्तार बेग मुबारक बेग वय २४ रा. जैनुर, तेलंगाना, यास अटक करण्यात आली असुन पोलीस स्टेशन राजुरा येथे अप.क्र. १३५/२०१९ कलम ४२०, ४०६, ३४ भादंवि सहकलम ३ सीड कंट्रोल ऑर्डर १९८३ आणि ७ (३)(४) पर्यावरण संरक्षण कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, राजुरा पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. गायगोले यांचे नेतृत्वात एसएसटी पॉइन्ट येथील कर्मचारी पोहवा गिरीधर नायगांवर, पोशि गणेश मेश्राम आणि कृषी विभागातील जिल्हा कृषी अधिकारी श्री. उदय पाटील, जे. डी. मोरे, नरेंद्र धोंगडे, मधुकर सोनटक्के यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

---

# अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन बल्लारशाह अंतर्गत फिर्यादीसोबत अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या आरोपींस दिनांक १२/०३/२०१९ रोजी **श्री. गांधे, जेएमएफसी कोर्ट बल्लारशाह जि. चंद्रपुर यांनी शिक्षा** ठोठावली आहे.

दिनांक ०२/११/२०१५ रोजी मौलाना आझाद वार्ड बल्लारशाह येथे यातील **आरोपी नामे शाहरूख शेख उर्फ धुव्वा मुन्ना शेख वय २० रा. राजेंद्रप्रसाद वार्ड बल्लारशाह,** आणि त्याचा फिर्यादी मित्र हे दोघेही एका पुतळया जवळ फिरत असतांना आरोपीने फिर्यादीस बाजुला असलेल्या झुडपी मध्ये नेवुन त्यासोबत अनैसर्गिक कृत्य केला. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. १६५/२०१५ कलम ३७७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोहवा. विलास गेडाम पोस्टे बल्लारशाह यांनी पुर्ण करून तपासादरम्यान गुन्हयातील आरोपीस अटक करून तपासाअंती आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक **१६/०२/२०१९** रोजी **आरोपी नामे शाहरूख शेख उर्फ धुव्वा मुन्ना शेख वय २० रा. राजेंद्रप्रसाद वार्ड बल्लारशाह, कलम ३७७ भादंवि मध्ये ०२ वर्ष कारावासाची शिक्षा व ५,०००/—रू दंड न भरल्यास ०१ महिना शिक्षा श्री. गांधे, जेएमएफसी कोर्ट बल्लारशाह जि. चंद्रपुर यांनी ठोठावली आहे. सदर प्रकरणात कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा अरविंद वाढई, पोस्टे बल्लारशाह** यांनी काम पाहीले आहे.

---

# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in



☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# मुल पोलीसांची अवैध दारू तस्करीवर कार्यवाही
# ०१ आरोपीसह ९ लक्षचा मुद्देमाल हस्तगत

जवळच आलेला होळी सण आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर अवैध दारू तस्करीवर प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवुन दारू तस्करी करणाऱ्यांवर वेळोवळी कार्यवाही करण्यात येत आहे.

दि. १६/०३/२०१९ रोजी मुल पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी टाटा झेनान वाहनाने चंद्रपुर जिल्हयात दारूबदी असुन सुध्दा दारूची तस्करी करणार आहे, अशा माहिती वरून मुल पोलसांनी मौजा ताडाळा चिचाळा येथे सापळा रचुन एका संशयीत टाटा झेनान एमएच ४० एफ ४६६७ वाहनास थाबंवुन ताब्यात घेतले. सदर वाहनाची पाहणी केली असता त्यातील मागच्या बाजुस गुप्त कप्पा तयार करून त्यामध्ये दारू असल्याचे दिसुन आल्याने वाहन चालक आरोपी नामे भिमराव देविदास येलनकर वय २७ रा. रातचांदना जि. यवतमाळ यास अटक करण्यात आली. आणि वाहनातुन ५० पेटया देशी दारू किं. ५,००,०००/—रू आणि एक टाटा झेनान वाहन किं. ४,००,०००/—रू आणि एक मोबाईल फोन किं. ५,०००/—रू, असा एकुण ९,०५,०००/—रू चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन मुल अप.क्र. २२९/२०१९ कलम ६५(ई), ८३ मदाका अन्वये नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, मुल पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. कासार, यांचे सह पोउपनि सतीश सोनेकर, पोहवा सुरेश पढाल, नापोकॉ. मुकेश गजबे, पोशि संजय जुमनाके यांनी पार पाडली.

---